CNR No. MHRG080016142025

| | |
|---|---|
| दाखल तारीख:– | ०७/११/२०२५ |
| नोंदणी तारीख:– | ०७/११/२०२५ |
| निकाल तारीख:– | ०६/०५/२०२६ |
| कालावधी :– | वर्षे महिने दिवस |
| | ०० ०५ २९ |

**(भाग ''अ'')**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.०२, खालापूर यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – दिपाली एस.खोत यांचे समक्ष)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९५२/२०२५** **निशाणी क्र.११/ब**

**महाराष्ट्र शासन**
द्वारा राज्य उत्पादन शुल्क,
कर्जत क्र. २, विभाग, जि. रायगड
गु.र. क्र.४७/२०२५ ... **अभियोग पक्ष** ...

**विरूध्द**

**शत्रुघ्न पखेलाल बोसाक**
वय – २७ वर्षे, व्यवसाय– मजुरी,
रा. ए. ए. चायनिज सेंटर, कुंभिवली,
ता. खालापूर, जि. रायगड. ... **आरोपी** ...

---

**विधिज्ञांची नावे** – सरकारतर्फे विधिज्ञ श्रीमती. पी. टी. बुये.
आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. टी. वाडेकर.

---

## (भाग ''ब'')

| | |
|---|---|
| अपराधाचा दिनांक | ०६/०९/२०२५ |
| फिर्याद दिनांक | ०६/०९/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०७/११/२०२५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०७/११/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २८/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवण्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०६/०५/२०२६ |
| शिक्षा घोषीत केल्याचा दिनांक, असल्यास | -- |

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | अपराधाचे कलम | शिक्षा दिली किंवा निर्दोष मुक्तता | शिक्षेचा तपशील | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये सुट देणेकामी कोठडीतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शत्रुघ्न पखेलाल बोसाक | समजपत्र | ०७/११/२०२५ | महाराष्ट्र दारू बंदी कायदा कलम ६५(ई) | निर्दोष मुक्त | ... | ... |

# (भाग ''क'')

## अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे साक्षीदारांचा तपशील :-

### अभियोग पक्षाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | दामोदर राजाराम आचारी | पंच | ०७ |
| २. | सौरभ संतोष दुर्गे | पंच | ०९ |

### आरोपी पक्षाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | ---- | -- |

### न्यायालयाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | ---- | -- |

## अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे कागदपत्रांचा तपशील :-

### अभियोग पक्षाचे कागदपत्र

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | ---- | -- |

### आरोपी पक्षाचे कागदपत्र

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | ---- | -- |

**न्यायालयाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | ---- | -- |

**मुद्देमालाचा तपशील** :-

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | देशी दारु जी.एम.संत्राच्या ९० मि.ली. मापाच्या ३५ सीलबंद बाटल्या अंदाजे किंमत रु.१,४००/-. | -- |

:: **न्यायनिर्णय** ::

(घोषित दिनांक : ०६/०५/२०२६)

आरोपी हा महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये संपरिक्षेस सामोरा जात आहे.

**अभियोग पक्षाचा खटला थोडक्यात खालीलप्रमाणे,**

२. दिनांक ०६/०९/२०२५ रोजी दु.नि. भरणे यांना मिळालेल्या बातमी नूसार दु.नि. भरणे साहेब व फिर्यादी सोबत इतर जवान स्टॉफ असे सर्वजण मिळून खाजगी वाहनाने कुंभिवली, ता. खालापूर, जि. रायगड येथे गेले. तेथे खाजगी वाहन रस्त्याच्या कडेला लावून पाई चालत जावून ए. ए. चायनिज सेंटर येथे येवून छापा टाकला असता, तेथे एक इसमाच्या ताब्यात देशी दारुचा साठा मिळून आला. त्यावेळी दु. नि. यांनी त्या इसमाला मद्य खरेदीची पावती आहे का असे विचारले असता त्याने मद्य खरेदीची पावती तसेच मद्य सेवनाचा परवाना नसल्याचे सांगितले त्यावेळी त्या इसमाला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव शत्रुघ्न पखेलाल बोसाक असे सांगितले. त्यावेळी त्याच्या ताब्यात देशी दारु जी. एम. संत्राच्या ९० मि.ली. मापाच्या

३५ सीलबंद बाटल्या हा मुद्देमाल मिळून आला. सदरचा मुद्देमाल दु.नि. भरणे यांनी पंचांसमक्ष पंचनामा करुन ताब्यात घेतला. त्यानंतर जप्त मुद्देमालातून रासायनिक तपासणीसाठी दोन बाटल्या नमुण्याकरीता काढून घेतल्या. सदर कारवाईचा रितसर पंचनामा दु.नि. भरणे यांनी केला. त्यानंतर फिर्यादी, जवान ए. एन. जज्ञर यांनी आरोपी विरुध्द सरकारतर्फे फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरुन निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कर्जत क्र. २, विभाग, जि. रायगड यांनी आरोपी विरुध्द अपराध क्र.४७/२०२५ अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा नोंदविला. सदर गुन्हयाचा तपास तपासी अधिकारी दुय्यम निरिक्षक भरणे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी जप्त मुद्देमाल तपासणीसाठी पाठविला, आरोपीला समजपत्र दिले, त्यानंतर त्यांनी निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कर्जत क्र. २, विभाग, जि. रायगड यांचे मार्फत महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये दोषारोपपत्र पाठविले.

४. मी निशाणी क्र.६ वर महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधाबाबत आरोपीवर गुन्ह्याचा तपशिल नोंदविला. उक्त तपशिल आरोपीने अमान्य असल्याचे सांगून संपरीक्षेची मागणी केली. आरोपीविरुध्द दोषात्मक पुरावा आढळून न आल्यामुळे भा.ना.सु.स. कलम ३५१ अन्वयेचे आरोपीचे निवदेन नोंदविण्यात आलेले नाही.

५. सरकारी अभियोक्ता श्रीमती.पी.टी.बुये यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीचे वकील श्री. एस. टी. वाडेकर यांचा युक्तीवाद ऐकला. एकंदरीत खालीलप्रमाणे मुद्दे माझे निदर्शनास येतात व त्यास पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे शाबीत करते काय की, दिनांक ०६/०९/२०२५ रोजी १६:४५ वाजताचे सुमारास मौजे कुंभिवली गावच्या हद्दीत ए.ए.चायनिज सेंटर ता. खालापूर, जि. रायगड येथे आरोपी त्याच्या ताब्यात देशी दारु जी.एम.संत्राच्या ९० मि.ली. मापाच्या ३५ सीलबंद बाटल्या अंदाजे मुल्य रु. १,४००/- किमतीचा मुद्देमाल विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगतांना मिळून आला ? | **.... नाही** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ व २ साठीः-</u>**

६. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाने गुन्हा शाबीत करण्यासाठी दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे.

७. अभियोग पक्षातर्फे पंच (सा.क्र.१) दामोदर आचारी व (सा.क्र.२) सौरभ दुर्गे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ०६/०९/२०२५ रोजी त्यांची मोटर सायकल बंद पडल्याने ते कुंभिवली येथील बस स्टॉप जवळील दुकानात गेले होते त्यावेळी त्यांना दु.नि. भरणे यांनी बोलवले व त्यांचे नाव व फोन नंबर विचारला. तेथे त्यांनी त्यांची लिहिलेल्या कागदावर सही घेतली त्यातील मजकूर त्यांनी वाचला नव्हता. त्यांच्या समक्ष काहीही जप्त करण्यात आलेले नाही. पंचनाम्यावरील सहया त्यांच्या आहेत. त्यातील मजकूर त्यांना सांगता येणार नाही. सदर दोन्ही साक्षीदार

त्यांच्या पोलिसांसमोरील जबाबशी विसंगत साक्ष देत असल्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदारांना विनंती पुर्वक उत्तर सुचक प्रश्न विचारले त्यामध्ये या साक्षीदारांनी दु.नि. भरणे यांनी त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त केल्याचे नाकारले आहे.

९. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीकडे मिळून आलेली देशी दारु रासायनिक विश्लेषणाकरिता पाठवली होती. अभियोग पक्षाचे कथन आहे की, आरोपीच्या ताब्यातून देशी दारु जप्त केली. परंतु पुरेशी संधी देवूनही अभियोग पक्षाने या प्रकरणात रासायनिक तपासणी अहवाल दाखल केलेला नाही. त्यामुळे रासायनिक तपासणी अहवाला शिवाय जप्त करण्यात आलेले द्रव्य ही देशी दारुच होती असे अनुमान काढता येणार नाही. साक्षीदार क्र.१ व २ यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा संशयापलिकडे सिध्द झालेला नाही. या प्रकरणात इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही. त्यामुळे आरोपी त्याच्या ताब्यात देशी दारू विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळून आला ही बाब संशयापलिकडे सिध्द होत नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या साक्षीमधून आरोपीविरूध्द कोणताही गुन्हा शाबीत होवू शकत नाही. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपीविरूध्द सदरचा गुन्हा शाबीत करण्यास पूर्णपणे अपयशी ठरला आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो व मुद्दा क्र. २ करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **शत्रुघ्न पखेलाला बोसाक** यांची महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) चे गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने अपिलीय न्यायालयात हजर राहणेकरिता रक्कम रू.१५,०००/– वैयक्तिक जातमुचलका फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये सादर करावा.

४. गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल आव्हाणाच्या कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

**(निकाल खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.)**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.05.06 18:16:59 +0530

**(डी. एस. खोत )**

स्थळ – खालापूर.
दिनांक – ०६/०५/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, खालपूर.